सेवेत पुनःस्थापित करणे बाबत.
श्री. आमले वैभव महारुद्र, सेवा निलंबीत,
कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती जामखेड

**अहमदनगर जिल्हा परिषद**
**सामान्य प्रशासन विभाग**
**जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-३/५८२२/९८८/२०२४**
**अहमदनगर दिनांक 22/७/२०२४**

वाचा:- १. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.निप्रआ-१११९/प्र.क्र.८६/११-अ दिनांक १४ ऑक्टोबर २०११
२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.निप्रआ-१११२/प्र.क्र.८२/११-अ दिनांक २० एप्रिल २०१३
३. इकडील निलंबन आदेश क्र.साप्रवि/आस्था-३/५९५/२०१८ दिनांक १९/०५/२०१८
४. या कार्यालयाकडील ज्ञापन/दोषारोपपत्र जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/८५१८/१२२२/२०२२ अ.नगर दिनांक ११/१०/२०२२
५. गट विकास अधिकारी, पंचायत समिती नगर यांचेकडील पत्र जा.क्र.आस्था-१/८९५/२०२२ दिनांक १४/११/२०२२
६. इकडील आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/८५१२/१३४२/२०२२ दिनांक २८/११/२०२२
७. या कार्यालयाकडील पुरवणी दोषारोपपत्र जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/८५१८/३४१/२०२३ अ.नगर दिनांक ०२/०८/२०२३
८. या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/७४२२/९८४/२०२३ दिनांक ०२/०८/२०२३
९. मा. सदस्य सचिव, विभागीय निलंबन आढावा समिती तथा उपायुक्त (महसुल) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र.मशा/पुनस्था-२०२३/प्र.क्र.१७/ई-८ दिनांक ०३/०४/२०२४

ज्या अर्थी श्री वैभव महारुद्र आमले, कनिष्ठ सहाय्यक हे पंचायत समिती जामखेड कार्यरत असतांना पंचायत समिती जामखेड येथील कार्यालयीन कामकाजात हलगर्जिपणा व गैरवर्तन करुन ४१,७८,७११/- रक्कमेचा अपहार करुन जिल्हा परिषदेची प्रतिमा मलीन केलेने श्री. आमले यांना या कार्यालयाचे संदर्भ क्रमांक-३ च्या आदेशान्वये जिल्हा परिषद सेवेतुन सेवा निलंबीत करणेत आले होते.

त्याआर्थी सदर प्रकरणी श्री वैभव महारुद्र आमले, सेवानिलंबित कनिष्ठ सहाय्यक यांना संदर्भ क्रमांक ४ व ७ अन्वये दोषारोप पत्र १ ते ४ बजावणेत येऊन संदर्भ क्रमांक ६ व ८ अन्वये विभागीय चौकशी प्रस्तावित करणेत आलेली आहे.

श्री वैभव महारुद्र आमले, सेवानिलंबित कनिष्ठ सहाय्यक यांना निलंबीत होऊन ५ वर्ष ९ महिने २७ दिवस इतका कालावधी झालेला असल्याने व मा न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या व विभागीय चौकशीच्या अधिन राहुन व त्यांचेकडील वसुलीच्या रकमेबाबत बंधपत्र करुन घ्यावे असा निर्णय सर्वानुमते विभागीय निलंबन आढावा समितीने घेतला आहे. मा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे कडिल संदर्भ क्र ९ च्या आदेशातील नमुद केलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन जिल्हा परिषद सेवेत पुन:स्थपीत करण्यात येत आहे.

१. सदर कर्मचा-यास पुर्ननियुक्ती देतांना सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्र.निप्रआ-१११२/ प्र.क्र.८२/११-अ दिनांक २०/०४/२०१३ मधील खालील मार्गदर्शक सुचनांनुसार अकार्यकारी पदावर नियुक्ती द्यावी.
   अ) राज्यस्तरीय संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांना त्यांच्या मुळ महसुली विभाग (Division) व ज्या पदावर कार्यरत असतांना निलंबित केले तो महसुल विभाग वगळुन अन्यत्र अकार्यकारी पदावर नियुक्ती देण्यात यावी.
   आ) विभागीय संवर्गातील कर्मचा-यांना पुनःस्थापित करतांना त्यांच्या मुळ जिल्हा व ज्या जिल्हयात कार्यरत असतांना निलंबित केले तो जिल्हा वगळुन अन्य जिल्हयात अकार्यकारी पदावर नियुक्ती द्यावी.

इ) जिल्हा संवर्गीय कर्मचा-यांना पुनःस्थापित करतांना त्यांचा मुळ तालुका व ज्या तालुक्यात कार्यरत असतांना निलंबित केले असेल तो तालुका वगळुन अन्य तालुक्यात अकार्यकारी पदावर नियुक्ती देण्यात यावी.

२. त्यांचे वरील फौजदारी केस सबंधी कामकाजावर त्यांचा दबाव येणार नाही. तसेच त्या विशिष्ठ प्रकरणात त्यांचेवर आरोप ठेवण्यात आले आहे त्या प्रकरणाशी त्यांचा दुरान्वयेही संबधी येणार नाही अशा ठिकाणी नियुक्ती दयावी.

३. नियुक्ती अधिकारी यांनी त्यांचे नियुक्ती आदेशाची प्रत विभागीय आयुक्त नाशिक यांना सादर करावी.

४. **श्री. आमले यांचेकडे एकुण १९,५१,३९०/- (व्याजाची रक्कम वगळता) रक्कम वसुली करणे प्रलंबित आहे. सदर अपहारीत रक्कम वसुली करणेकरीता त्यांना देय असणारे दरमहाचे मासिक वेतनातुन .६०. % वेतन हे वसुलीची रक्कम म्हणुन कपात करणेत येऊन शासकिय लेखाशिषाखाली भरणा करणेत येऊन वसुली बाबत श्री. आमले यांच्या मुळ सेवापुस्तकात नोंद घेणेत यावी.**

श्री वैभव महारुद्र आमले, यांना संदर्भ क्र.३ नुसार केलेले निलंबन आदेश रद्द करुन त्यांना जिल्हा परिषद सेवेत वर नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहुन व मा न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या तसेच विभागीय चौकशीच्या अधिन राहुन जिल्हा परिषदे मध्ये कनिष्ठ सहाय्यक (लि) वर्ग-३ या पदावर सामावुन घेवून पंचायत समिती राहुरी ............ येथे अकार्यकारी पदावर नेमणुक करीत आहे.

सदर आदेशाची नोंद श्री. आमले वैभव महारुद्र, कनिष्ठ सहाय्यक, यांचे मुळ सेवापुस्तकात घेणेत यावी व तसा अहवाल सादर करावा.

सदरचा आदेश हा अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 202407220040066 असा आहे.

(आशिष येरेकर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति

श्री. आमले वैभव महारुद्र, सेवा निलंबीत कनि सहाय्यक,
द्वारा:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती नगर

प्रत:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती नगर

२/- सदरचा आदेश श्री. आमले वैभव महारुद्र, सेवा निलंबीत कनि सहाय्यक, यांना बजावणेत येवून दिनाकिंत स्वाक्षरी घेतलेली प्रत या कार्यालयास विनाविलंब सादर करणेत यावी.

प्रत:- गटविकास अधिकारी, पंचायत समिती राहुरी.

२/- श्री. आमले हे कनिष्ठ सहाय्यक या पदावर सेवेत रुजु झालेनंतर रुजु अहवाल इकडेस सादर करावा. तसेच श्री. आमले यांना अकार्यकारी पदाचे (आवक, माहिती अधिकार इ कार्यासनाचे ज्या कार्यासनाकडे आर्थीक बाबींचा समावेश असणार नाही असे) कामकाज सोपविणेत येऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत:- मा. अध्यक्ष, विभागीय निलंबन आढावा समिती तथा विभागीय आयुक्त यांना माहितीस्तव सविनय सादर

प्रत:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड

प्रत:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर

प्रत:- निवड नस्ती

(आशिष येरेकर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर